# जिल्हा परिषद रत्नागिरी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन.
माळनाका रत्नागिरी ४१५६१२

## सामान्य प्रशासन विभाग

दूरध्वनी क्र-:. ०२३५२/२२२४२८ ईमेल आय डी -: dyceogad08@gmail.com

जा.क्र. रजिप/साप्रवि/लेखा२/वैदय/ ११४३ /२०२३ दिनांक :-१२/०४/२०२३

**वाचले** :- १.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वैदयकिय परिचर्या) नियम १९७१.
२.शा.नि.सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.एमएजी-१०८४/४१५७/सीआर-१५६/दि.२९.४.१९८५.
३.शा.नि.सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.डीएसआर ४९८६/२५९९-सीआर (१८२९)-१७ दि.११.६.८६
४.शा.नि.सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.एमएजी-१०९५/सीआर-४५/आरोग्य-७,दि.१५.११.९७
५.शा.नि.सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एमएजी-२००५/प्र.क्र.२५१/आर-३ दि.२०.२.२००६
६. शासन परिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०१३/प्र.क्र.२९१/१३/राकावि-२,**दिनांक ११ ऑक्टो १३.**
७) सार्व.आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-१९/प्र.क्र.२३६/ राकावी-२/ दिनांक २७ **मार्च,** २०२०.
८) वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र जाकादेवी,रत्नागिरी कडील जा.क्र.प्राआकेंजा/आ-१/६४/२३, दि.०६.०४.२३.
९) या कार्यालयाकडील मंजूर टिप्पणी दिनांक -१२/०४/२०२३.

**<u>आदेश :-</u>**

श्री.प्रितेश भिकाजी सावंत, कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र जाकादेवी ता.जि.रत्नागिरी यांनी स्वत:च्या आजारपणाचे उपचारासाठी (**यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणे**) या आजारावर वैद्यकिय उपचार करणेत येणार आहेत. शासनमान्य खाजगी रुग्णालय " **सह्याद्री स्पेशालिटी हॉस्पीटल, एरंडवणा, पुणे** " या रुग्णालयाचे प्रमाणपत्रामध्ये सदर आजाराचे वैद्यकिय उपचारासाठी र.रु. २२ लक्ष ते २४ लक्ष एवढा खर्च येणार असल्याचे नमूद करणेत आलेले आहे.

महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र. एमएजी/१०९५/सीआर-४५/आरोग्य-७ दि.१५ नोव्हेंबर १९९७ चे परिशिष्ट "अ" मधील खालील नमूद केलेल्या अटींना अधिन राहून महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-१९/प्र.क्र.२३६/ राकावी-२/ दिनांक २७ मार्च, २०२० अन्वये श्री.प्रितेश भिकाजी सावंत, कनिष्ठ सहायक, प्राथमिक आरोग्य केंद्र जाकादेवी ता.जि.रत्नागिरी यांना (यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणे) या आजाराचे वैद्यकिय उपचारासाठी र.रु. ३,७५,०००/- (अक्षरी र.रु. तीन लक्ष पंच्याहत्तर हजार मात्र) अग्रीम या आदेशाव्दारे मंजूर करणेत येत आहे.

१. सदरचे अग्रीम महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वैद्यकिय परिचर्या) नियम १९७१ अ नुसार प्रतिपूर्ती मिळणा-या उपकरणांच्या व शासनाच्या तरतूदीनुसार ज्या उपचारांच्या खरेदीवरील व औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय असलेल्या खर्चासाठीच अनुज्ञेय आहे.

२. नियमाचे योग्य पालन करुन आणि ज्या कारणासाठी हे अग्रीम मंजूर झाले आहे. त्याच कारणासाठी व शासकीय अथवा शासनमान्य खाजगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी घेतले असेल तेथेच ते उपयोगात आणले गेले पाहीजे, हे पाहण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

३. अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत दिलेले अग्रीम वसूल करण्यात येईल अथवा शासकीय कर्मचा-यास देय असलेल्या वैद्यकिय प्रतिपूर्तीच्या रक्कमेतून समायोजित करणेत येईल. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील.

४. जर अग्रीमाची संपूर्ण रक्कम वैदयकिय प्रतिपूर्तीच्या देयकामधून वसूल होण्यासारखी नसेल तर उरलेली रक्कम शासकीय कर्मचा-याच्या वेतनातून अथवा इतर देय असलेल्या रक्कमेतून अनिवार्य परिस्थिती सोडून एकाच हप्त्यात वसुल करण्यात येईल.

५. अग्रीम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत दिलेले अग्रिम वसूल झाले नाही तर उर्वरीत बाकी रक्कमेवर अग्रिमासाठी आदेय (Admissable) असलेल्या व्याजाच्या कमीत कमी दराने व्याज आकारण्यात येईल.

६. मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचा-यास प्रत्यक्ष शस्त्रक्रियेच्या दिनांकापूर्वी जास्तीत जास्त १५ दिवस अगोदर देण्यात यावी.

श्री.प्रितेश भिकाजी सावंत, कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र जाकादेवी ता.जि.रत्नागिरी यांचे वेतन ज्या लेखाशिर्षा खाली खर्च पडते त्याच लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे तरतूदी मधुन सदरचा खर्च करावयाचा आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या अटीना अधिन राहून या आदेशाव्दारे मंजूर केलेले अग्रिम प्रदान करणे व त्याचे समायोजन करणेची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील. सदर अग्रिमाची नोंद अग्रिम नोंदवहीत घेण्यात यावी.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला असून त्याचा सांकेताक क्र. 20230412910€3 असा आहे.

( किर्ती किरण पुजार, भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत:-माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र जाकादेवी ता.जि.रत्नागिरी यांजकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२. श्री.प्रितेश भिकाजी सावंत, कनिष्ठ सहाय्यक,प्राथमिक आरोग्य केंद्र जाकादेवी रत्नागिरी यांना कार्यालयामार्फत रवाना.